महाराष्ट्र शासन
मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प
(जागतिक बँक सहाय्यित उपक्रम)

जा.क्र./स्मार्ट/स.प्र. अ/छाननी /१६२ /२०२२ दिनांक:- २५ /०२/२०२२.

प्रति,

१) मा. विभाग प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, सर्व
२) नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, सर्व
३) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व
४) प्रकल्प संचालक आत्मा, सर्व

**विषयः- स्मार्ट प्रकल्पांतर्गत प्राथमिक मान्यता दिलेल्या समुदाय आधारित संस्थांच्या सविस्तर अहवाल छाननीबाबत.**

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.स्मार्ट/स.प्र.अ/९६१ दि.२९/१०/२१ व १११ दि.०८/०२/२२.
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.स्मार्ट/स.प्र.अ/तपासणी/१०९/२२ दि.०८/०२/२०२२.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत संदर्भ क्र १ अन्वये ५३१ समुदाय आधारित संस्थांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्राथमिक मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार समुदाय आधारित संस्थांनी तयार करून सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाची तपासणी करणेकरिता संदर्भ क्र. २ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सीबीओंनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाची तपासणी करून गुणांकनासह (प्रपत्र ५) अंतिम मंजुरीसाठी शिफारस करणे अभिप्रेत आहे. गुणांकनाकरिता प्रपत्र ५ निर्गमित करण्यात आलेले आहे. सविस्तर प्रकल्प अहवालाचे मूल्यमापन करताना खालील अभिलेखे तपासून गुणांकन पत्रिकेसोबत सादर करावी.

प्रकल्प समन्वय आणि अंमलबजावणी कक्ष, शेती महामंडळ भवन, 270, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे 411 016 (महाराष्ट्र)
दूरभाष: ०२०२५६५६५७७/८ वेबसाईट: www.smart-mh.org ईमेल: pcmu.smart@gmail.com

१) सीबीओंची भागधारक संख्या तपासताना शेतकरी उत्पादक कंपनीची CS/CA प्रमाणित भागधारकांची यादी, CLF आणि CMRC संदर्भात जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची प्रमाणित सदस्यांची यादी पहावी.

२) अत्य व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांची संख्या संबंधित गावच्या स्थानिक कृषि सहाय्यकामार्फत तपासून कृषि सहाय्यकाचे प्रमाणपत्र घ्यावे.

३) महिलांची संख्या प्रमाणित भागधारकांच्या यादीतून तपासावी.

४) अनुसूचित जाती आणि जमाती शेतकऱ्यांची संख्या याबाबतची खात्री क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत तपासून घ्यावी.

५) शेतकरी उत्पादक कंपनीचे भागभांडवल (Paid up Capital) तपासताना https://www.mca.gov.in/mcafoportal/viewCompanyMasterData.do या लिंकवर जावून कंपनीचा नोंदणी क्रमांक टाकून खात्री करावी.

६) सीबीओची उलाढाल तपासताना लेखापरीक्षण अहवालातील Profit & Loss statement मध्ये Revenue from sale, services or Both यात नमूद रक्कम खात्री करावी.

७) सीबीओस पूर्वानुभव आहे की नाही हे तपासताना संस्थेचे मागील कृषि व्यवसायासंबंधी उपक्रम तपासावे व त्यातून झालेली उलाढाल आणि सभासदांना झालेला फायदा तपासून कृषि सहाय्यकाने प्रमाणपत्र द्यावे.

८) सीबीओकडे विक्रीयोग्य व गुणवत्तापूर्ण शेतमालाची उपलब्धता संस्थेच्या भागधारक व बिगर भागधारकांच्या जमीन धारणा व तेथील पिकाची सरासरी उत्पादकता यावरून तपासून मंडळ कृषि अधिकाऱ्याने प्रमाणपत्र द्यावे.

९) फॉरवर्ड लिंकेज तपासताना सीबीओने सादर केलेल्या सामंजस्य करारामधील खरेदीदारा समवेत आर्थिक व्यवहाराची देयके यावरून खात्री करावी.

१०) बॅकवर्ड लिंकेज तपासताना सीबीओने भागधारकाकडून शेतमाल एकत्र करून विक्री करून पेमेंट केले असल्याचे संस्थेचे बँक स्टेटमेंट पहावे.

११) सीबीओकडे प्रस्तावित उपप्रकल्पाकरिता पायाभूत सुविधा (जागा, वीज, रस्ता, पाणी इ.) असल्याची खात्री जिल्ह्याच्या प्रकल्प उपसंचालक आत्मा यांनी व्यक्तिश: भेट देवून तपसावी व त्याचे प्रमाणपत्र द्यावे.

१२) सीबीओच्या सविस्तर प्रकल्प अहवालातील आर्थिक गुणोत्तरे (IRR, BEP व DSCR) तपासताना Business कॅल्कुलेटर मधील शीट क्र. ९.१, ९.२ व ९.६ याची खात्री करावी.

१३) सीबीओ उपप्रकल्पासाठी स्वहिस्सा उभारणी कशी करणार याबाबत संस्थेचे लेखी हमीपत्र तसेच बँक कर्ज घेणार असल्या LoI घ्यावा.

वरील प्रमाणे सर्व कागदपत्रांची तपासणी करून संबंधित अभिलेख्यांसह गुणांकण पत्रिका (प्रपत्र ५) व तपासणी सूची प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या स्वाक्षरीने संचालक आत्मा यांना सादर करावी.

(दशरथ तांभाळे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट

प्रकल्प समन्वय आणि अंमलबजावणी कक्ष, शेती महामंडळ भवन, 270, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे 411 016 (महाराष्ट्र)
दूरभाष: ०२०२५६५६५७७/८ वेबसाईट: www.smart-mh.org ईमेल: pcmu.smart@gmail.com